01-02-2025-Dai-04FF_DH_PAN_20_08_2016-3.qxp 01/31/2025 11:37 PM Page 1



## निवडक

### डॉ. गुरुदास नाटेकर यांना गोवा गौरव पुरस्कार

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. ३१ :** गोव्यातील नामवंत साहित्यिक डॉ. गुरुदास नाटेकर यांना त्यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल गोवा गौरव पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात येणार आहे. हा सन्मान सोहळा रविवार दि. २ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता बोगमाळो बीच रिसॉर्टमध्ये पार पडणार आहे. डॉ नाटेकर यांची आजवर ३१ पुस्तके प्रकाशित झाली असून, त्यांनी आपल्या कादंबरीचा मराठी, हिंदी, कोकणी आणि इंग्रजीमध्ये अनुवाद केला आहे. त्यांचे दोन संशोधनात्मक प्रबंध प्रकाशित झालेले आहे. आजवर सामाजिक, साहित्य, उद्योग, राजकीय, शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानासाठी देश–विदेशात २७५ हुन अधिक सत्कार केले गेले आहेत.

---

### नामांकित गझल मंथन साहित्य संस्था युवकांसाठी गझल कार्यशाळा घेणार

**मुंबई, दि. ३१ :** महाराष्ट्रातील नामांकित गझल मंथन साहित्य संस्थेमार्फत लवकरच महाविद्यालयीन युवकांसाठी नि:शुल्क विशेष गझल लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमांतर्गत संस्थेचे तज्ज्ञ मार्गदर्शक महाविद्यालयांमध्ये जाऊन युवकांना गझलेची बाराखडी शिकविणार आहेत. गझल मंथन साहित्य संस्था विविध प्रयोग व अभिनव उपक्रम राबविण्यासाठी प्रसिद्ध आहे. संस्थेने आता एक महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. युवकांना साहित्याची गोडी लागावी. त्यांनी लिहिते होऊन सशक्त आणि सकस लेखन करावे. महाराष्ट्रात तरुण गझलकार तयार व्हावेत, या उद्देशाने गझल मंथन साहित्य संस्थेमार्फत ही नि:शुल्क मोहीम राबविण्याचे ठरवले आहे.

या गझल लेखन कार्यशाळेमध्ये गझल मंथन साहित्य संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक आणि नवी मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड महाविद्यालयीन युवकांना गझल लेखनासाठी मार्गदर्शन करतील.अधिक माहितीसाठी महाविद्यालयांनी तथा युवकांनी गझल मंथन साहित्य संस्थेचे कोकण विभाग प्रमुख व गझल लेखन कार्यशाळा आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ .मनोज वराडे (मो.९८६९३३६३३७) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन गझल मंथन साहित्य संस्थेचे अध्यक्ष अनिल कांबळे, उपाध्यक्ष वसुदेव गुमटकर, सचिव जयवंत वानखडे, सहसचिव उमा पाटील यांनी केले आहे.

---



**पर्ये : रुद्रेश्वर रथयात्रेच्या स्वागत प्रसंगी भाविक.**

### रुद्रेश्वर देवाच्या रथयात्रेचे तुळशीमळा येथील भक्तीकुटीरात स्वागत

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ३१ :** हरवळे सांखळी येथील श्री रुद्रेश्वर देवाच्या रथयात्रेचे आगमन आजोबानगर होंडाहून तुळशीमळा मठ पर्ये येथील भक्तीकुटीरात झाले. याठिकाणी त्याचे हरे कृष्ण महामंत्राने भव्य स्वागत करण्यात आले. अंकुश रा. मांजरेकर यांनी फळांनी ओवाळणी केली तसेच सुवासिनींद्वारे भगवंतांना ओवाळण्यात आले. पर्येचे उपसरपंच आत्माराम शेट्ये यांनी सपत्नीक पूजा केली.नंतर महाप्रसाद झाला.श्री वाठारी कल्चरल ग्रुपचे अध्यक्ष श्याम पेडणेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. श्री रुद्रेश्वर देवस्थानाचे अध्यक्ष यशवंत माडकर, सचिव संगेश कुंडईकर,कार्यकारिणीचे सचिव किरण कांदोळकर, शिवदास माडकर, श्री. मिशाळ यांचा सन्मान श्रीकांत मांद्रेकर, मुकुंद मांद्रेकर, उद्धव मांद्रेकर, सदानंद पेडणेकर, प्रज्योत नाईक, लक्ष्मिकांत शिरोडकर शाल व भगवतगीता देऊन केला.

तुळशीमळा, मठ पर्ये, मोर्ले महाजनतर्फे प्रशांत आनंद मांद्रेकर यांनी किरण कांदोळकर यांच्याहस्ते रुद्रेश्वराचा फोटो स्वीकारला समीर भानुदास हळदणकर यांनी आभार मानले. दुसऱ्या दिवशी सुरेश मांद्रेकर यांनी श्रींची पूजा केल्यानंतर भक्तीकुटिरहून श्रींची रथयात्रा डिचोलीला निघाली. उत्सवाला पर्येच्या पंचसदस्य रती रामा गावकर यांची उपस्थिती होती.

---

### हरमल येथील सिम्रेश्वर देवस्थानचा ५ रोजी जत्रोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड



**हरमल, दि. ३१ :** खालचावाडा दर्यासंगमावरील श्री सिम्रेश्वर देवस्थानचा वार्षिक जत्रोत्सव बुधवार दि. ५ रोजी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार असल्याचे देवस्थानचे अध्यक्ष नारायण रेडकर यांनी सांगितले. या निम्मित सकाळी धार्मिक विधी, श्री सत्यनारायण महापुजा, आरती, तीर्थप्रसाद, महाप्रसाद, रात्री पावणी व त्यानंतर नाईक मोचेमाडकर दशावतारी नाटक होणार आहे. तरी भाविकांनी उपस्थित राहून श्रीकृपेस पात्र व्हावे, असे आवाहन देवस्थान समितीने केले आहे.

---

### पार्सेकर महाविद्यालयात 3 पासून गणित कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ३१ :** येथील गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शुक्रवार दि. ३ व शनिवार दि. ४ रोजी गणित विषयक प्रशिक्षण व प्रज्ञा शोध वर्गाचे आयोजन केले आहे. या प्रशिक्षण कार्यशाळेस प्रोफेसर डॉ. अनंत नारायण हरिहरन, आयआयटी पवई मुंबई व जयहिंद कॉलेज मुंबई गणिताचे प्राध्यापक प्रनील वाईकर तसेच सल्लागार प्राध्यापक उपस्थित राहणार आहेत.ह्या कार्यशाळेचे आयोजन पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे मॅथ विभागाचे प्रा. सूरज परमेकर,इन चार्ज हेड प्रा. नम्रता देविदास खोर्जे व सहाय्यक प्रा सोहम आश्वेकर आहेत.

---

### पेडणेत १० रोजी विश्वकर्मा जन्मोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ३१ :** पेडणे विश्वकर्मा ट्रस्ट तर्फे विश्वकर्मा जन्मोत्सव सोमवार दि. १० रोजी स्नेहल सखाराम च्यारी व गौतमी गुरुदास च्यारी यांच्या यजमानपदाखाली साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळी शुद्धी होम दुपारी १२ वाजता विश्वकर्मा जन्मोत्सव त्यानंतर पूजा आरती तिर्थप्रसाद व महाप्रसाद महिला मंडळातर्फे हळदीकुंकू सायंकाळी ४ वाजता केदार विश्वास मेस्त्री खुटवळ व दिव्या च्यारी मयडे यांचा भाव भक्ती नाट्यगीत व सुगम संगीताचा बहारदार कार्यक्रम त्यांना विश्वास मेस्त्री (हार्मोनियम) विठ्ठल मेस्त्री (तबला) साथसंगत करणार आहेत ५.३० वाजता विद्यार्थी गौरव प्रमुख पाहुण्या आरती च्यारी (सरपंच काणका पंचायत) पंच उमेश च्यारी पंच देविदास च्यारी अध्यक्ष संजय च्यारी सखाराम च्यारी गुरुदास च्यारी उपस्थित राहणार आहेत. भाविकांनी श्री कृपेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# टीम इंडियाची मालिकेत विजयी आघाडी

## इंग्लंडविरुद्धचा चौथा टी- ट्वेंटी सामना १५ धावांनी जिंकला : हार्दिक-दुबेनंतर हर्षित राणाचा जलवा

**पुणे, दि. ३१ :**



शिवम दुबे (५३) आणि हार्दिक पांड्या (५३) यांनी मोक्याच्या क्षणी झळकाविलेली अर्धशतके आणि त्यानंतर हर्षित राणा व रवी बिश्नोई केलेल्या शानदार गोलंदाजाची जोरावर भारतीय क्रिकेट संघाने इंग्लंडविरुद्धचा चौथा टी– ट्वेंटी सामना १५ धावांनी जिंकला. या विजयासह भारताने मालिकाही आपल्या नावावर केली आहे. चारपैकी तीन सामने जिंकत भारताने या मालिकेत ३–१ अशी विजयी आघाडी घेतली आहे. पुण्याच्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडसमोर १८२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. पण इंग्लंडचा डाव १६६ डावांत आटोपला. त्यामुळे भारताने इंग्लंडवर १५ धावांनी विजय साकारला.

भारताकडून मिळालेल्या १८२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडने अर्धशतकी सलामी दिली होती. त्यामुळे इंग्लंड हा सामना जिंकेल, असे त्यावेळी वाटत होते. पण त्यावेळी भारतीय संघासाठी धावून आला तो रवी बिश्नोई. रवीने यावेळी प्रथम बेन डकेटला बाद केले, त्याने ३९ धावा केल्या. रवीने त्यानंतर जोस बटलरला दोन धावांवर बाद केले आणि भारताला मोठे यश मिळवून दिले. पण त्यानंतर हॅरी ब्रुक हा भारताच्या विजयात मोठा अडसर बनलेला होता.या दरम्यान, दमदार फलंदाजी करीत हॅरी ब्रुकने अर्धशतक पूर्ण केले. हॅरी ब्रुकने ५ चौकार आणि दोन षटकारांनिशी ५१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करीत इंग्लंडच्या विजयाच्या आशा पल्लवित ठेवल्या होत्या. पण वरुण चक्रवर्तीने बाद करीत भारताला मोठे यश मिळवून दिले. हॅरी ब्रुक माघारी परतल्यानंतर मैदानात आलेल्या इतर फलंदाजांनी हजेरी लावण्याचे काम केल. त्यामुळे सामना भारताच्या बाजूने झुकला आणि इंग्लंडचा डाव १९.४ षटकात १६६ धावांत आटोपला. भारतातर्फे हर्षित राणा आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी तीन– तीन गडी बाद केले. वरूण चक्रवर्तीने दोन तर अर्शदीप आणि अक्षर पटेलने प्रत्येकी एक– एक गडी टिपला.

तत्पूर्वी, इंग्लंडने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीस आमंत्रित केले. भारतीय संघाला दुसऱ्याच षटकात तीन धक्के बसले आणि भारताचा डाव गडगडेल, त्यांच्या धावांवर अंकुश बसेल, असे वाटत होते. कारण इंग्लंडच्या साकिब महमूदने एकाच षटकात हे तीन पण रिंकू सिंगने यावेळी भारताला या पडझडीतून बाहेर काढले. पण रिंकूला मोठी खेळी साकारता आली नाही. रिंकूने यावेळी ४ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ३० धावांची दमदार खेळी साकारली. रिंकू बाद झाल्यावर भारतावरचे दडपण वाढेल, असे वाटत होते. पण त्यानंतर शिवम दुबे आणि हार्दिक पांड्या यांची दमदार भागीदारी झाली आणि त्यामुळे भारताला धावांचा डोंगर उभारता आला. शिवम आणि हार्दिक यांनी पाचव्या विकेटसाठी ७३ धावांची भागीदारी रचली आणि त्यामुळेच भारताला १८१ धावांपर्यंत मजल मारता आली. शिवमने यावेळी ३४ चेंडूंत सात चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ५३ धावांची खेळी साकारली. हार्दिनेहीही यावेळी ३० चेंडूत ५३ धावा केल्या, यामध्ये चार चौकार आणि चार षटकारांचा समावेश होता. त्यामुळे भारताने निर्धारिकत २० षटकात ९ बाद १८१ धावा केल्या. इंग्लंडतर्फे साकिब महमूदने सर्वाधिक तीन गडी बाद केले. ओवर्टनने २ गडी टिपले.




**मिरामार : जायंट्स वेलफेअर फेडरेशन नवनिर्वाचित अध्यक्ष संजय बाणावलीकर समवेत एडविन मिनेझिस, नरूद्धिन सेवाला व इतर.**

# जायंट्स वेलफेअर फेडरेशनचे अधिकारग्रहण

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ३१ :** राज्यात हरितक्रांती घडवून आणण्यासाठी बिगर सरकारी संस्थांबरोबर सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या संस्थाने पुढाकार घेतला पाहिजे. तेव्हाच आमचा गोवा कृषी प्रधान राज्य होणार असल्याचे प्रतिपादन उद्योजक एडमिन मिनेझिस यांनी जायंट्स वेलफेअर फेडरेशन च्या .

प्रमुख पाहुणे या नात्याने केले जायंट्स वेलफेअर फेडरेशन १० विभागाचा अधिकारग्रहण सोहळा पणजी मिरामार येथील गॅसपर डायस सभागृहात पार पडला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक एडमिन मिनेझिस सन्माननीय पाहुणे नैरोद्दीन सेवालाल जायंट्स वेलफेअर फेडरेशनचे केंद्रीय समितीच्या सदस्य संदीप नाडकर्णी खास सदस्य नाझरेथ वाझ, सुदन नाईक, वर्षा नाईक उपस्थित होते याप्रसंगी जायंट्स वेलफेअर फेडरेशन १० गोवा विभागाच्या अध्यक्षपदी संजय बाणावलीकर यांची निवड करण्यात आली. तर सचिव पदी प्रदीप पेडणेकर यांची निवड करण्यात आली. निवडण्यात आले ईतर सदस्य खालील प्रमाणे किशोर देशपांडे डॉक्टर स्वाती दिवकर दामोदर नाईक विलास पिळर्णकर, प्रदीप बांदेकर, भालचंद्र आमोणकर, डॉ. नूतन बिचोलकर विठ्ठल पार्सेकर, सुधीर रीवणकर, श्रीपाद येंडे, हनुमंत आजगावकर, निलेश होडकर एकनाथ पास्ते, उर्मिला येंडे यावेळेस सन्मानित पाहुणे नरूद्धिन सेवाला यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले मान्यवरांचे स्वागत अध्यक्ष संजय बाणावलीकर यांनी केले.

प्रमुख पाहुणे व सन्माननीय पाहुण्यांची ओळख प्रदीप बांदेकर व गोविंद रमाणी यांच्यनी केली. कार्यक्रम सूत्रसंचालन भालचंद्र आमोणकर, आभार प्रदर्शन सचिव प्रदीप पेडणेकर यांनी केली कार्यकामाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# मल्लिकार्जुन देवाच्या रथसप्तमी जत्रोत्सवाला उद्यापासून प्रारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड





**आगोंद, दि. ३१ :** श्रीस्थळ, काणकोण येथील प्रसिद्ध श्री मल्लिकार्जुन देवस्थानात रविवार दि. २ फेब्रुवारी रोजी, रथसप्तमी जत्रोत्सवाची सुरुवात होईल व दि. ६ दरम्यान उत्तररात्री श्रींची महारथातून मिरवणूक काढून जत्रोत्सवाची सांगता होईल.

प्रथम दिनी रविवार दि. २ रोजी सकाळी श्रींस अभिषेक व लघुरुद्र. रात्री ८.३० वाजता श्रींची उत्सव रथातून मिरवणूक, महापूजा, महाप्रसाद व ९.३० वाजता श्रीस्थळवासी कलाकारांकडून ‘जय जय गौरीशंकर’ या अजरामर पौराणिक नाटकाचा प्रयोग सादर केला जाईल.

सोमवार दि. ३ रोजी सकाळी श्रींस अभिषेक, लघुरुद्र इत्यादी धार्मीक विधी होतील व रात्री ८.३० वाजता विजय रथातून श्रींची मिरवणूक काढली जाईल. नंतर महापूजा, महाप्रसाद व ९.३० वाजता श्री मल्लिकार्जुन नुतन नाट्य संपदा संस्थेतर्फे ‘अबोल प्रीतीची अजब’ कहाणी या मराठी विनोदी नाटकाचा प्रयोग सादर केला जाईल.

तिसऱ्या दिवशी मंगळवार दि. ४ रोजी सकाळी धार्मीक विधी पार पडतील. दुपारी खांद्यावरील रथाचे रथोद्यापन. संध्याकाळी ४ वाजता महाजन व भाविक मोठ्या उत्साहाने श्रींची खांद्यावरील रथातून नाचत बागडत मिरवणूक काढतील. तरुण तसेच उत्साही वयस्क भाविक मोठ्या संख्येने खांद्यावरील रथ नाचत मिरवत नेण्याच्या सोहळ्यात सहभागी होतात. रात्री ८.३० वाजता पालखी, महापूजा, महाप्रसाद होईल व नंतर ९.३० वाजता गुळे येथील नाट्यकलाकारातर्फे ‘प्रेमाचे ॲपल’ या मराठी धमाल विनोदी नाटकाचा प्रयोग सादर केला जाईल.

चौथ्या दिवशी बुधवार दि. ५ रोजी सकाळी नित्य धार्मिक विधी व रात्री ८.३० वाजता श्रींची लालखी रथातून मिरवणूक काढली जाईल. नंतर पूजा व महाप्रसाद झाल्यावर ९.३० वाजता वैजावाडा नाट्य कलाकारांतर्फे ‘सिंहाचा छावा’ या पौराणिक संगीत नाटकाचा प्रयोग सादर केला जाईल.

गुरुवार दि. ६ रोजी सकाळी श्रींस अभिषेक, लघुरुद्र दुपारी हवन रथोद्यापन, श्रींचे रथारोहण व महाप्रसाद होईल. रात्री महापूजा व १०.३० वाजता नुवेकर नाट्यकलाकारांतर्फे ‘मेघगर्जना’ या ऐतिहासीक नाटकाचा प्रयोग सादर करतील. नंतर श्रींस काणुक नंतर पहाटे महाजन व भाविकांच्या उपस्थितीत श्रींची महारथातून मिरवणूक काढली जाईल. त्यानंतर सर्व उपस्थित भक्तांना गुढी प्रसाद वाटला जाईल व जत्रोत्सवाची सांगता होईल. नूतन उत्सव मूर्तीची रथातून मिरवणूक हे यंदाच्या जत्रोत्सवाचे खास वैशिष्ट्य असेल. सर्व महाजन, कुळावी, ग्रामस्थ भक्तगणानी मोठ्या संख्येने या सोहळ्यास उपस्थीत राहून श्रींचे आशीर्वाद घ्यावे, असे आवाहन कार्यकारी समितीतर्फे केले जात आहे. जत्रौत्सव यशस्वी होण्यासाठी महाजन, कुटुंब प्रतिनिधी, वांगडी,ब्राम्हण, वेळीप, सेवेकरी. कार्यकारी समिती प्रयत्नशील आहे.

# भारताचा महिला संघ अंडर–१९ विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक

## इंग्लंड महिला संघाचा ९ गडी राखून पराभव : पारुनिका सामनावीर

**क्वालालंपूर, दि. ३१ :**



१९ वर्षांखालील महिलांच्या टी–२० विश्वचषकात अजेय राहिलेल्या भारतीय संघाने अंतिम फेरीत धडक मारली आहे. अंडर–१९ महिला टी–२० विश्वचषकाचा दुसरा उपांत्य सामना भारत आणि इंग्लंड यांच्यात खेळवला गेला. शुक्रवार ३१ जानेवारी रोजी झालेल्या या सामन्यात भारतीय संघाने शानदार कामगिरी करत इंग्लंडचा ९ विकेट्स राखून पराभव केला. टीम इंडियाने सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

भारतीय संघ १९ वर्षांखालील महिलांच्या टी–२० विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अंतिम सामना खेळणार आहे. या स्पर्धेत दोन उपांत्य फेरीचे सामने झाले. पहिल्या फेरीत दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाचा पराभव केला. तर दुसऱ्या फेरीत भारताने इंग्लंडला धूळ चारत अंतिम फेरीत प्रवेश केला. आता भारत आणि दक्षिण आफ्रिका विजेतेपदाच्या लढतीत आमनेसामने येणार आहेत. हा सामना रविवार २ फेब्रुवारी रोजी होणार आहे. भारतीय संघ या स्पर्धेचा गतविजेता संघ आहे.

भारत वि दक्षिण आफ्रिका ण१९ टी–२० विश्वचषक फायनल किती वाजता सुरू होणार?

भारत वि दक्षिण आफ्रिकेचा महिला अंडर–१९ संघ अंतिम फेरीत भिडताना दिसणार आहेत. हा अंतिम सामना बायुम्मास ओव्हल क्वालालंपूर येथे होणार आहे. भारतीय वेळेनुसार हा सामना दुपारी १२ वाजता खेळवला जाईल.

भारतीय संघाने आतापर्यंत महिलांच्या अंडर–१९ टी–२० वर्ल्ड कपमध्ये एकही सामना गमावलेला नाही. त्यांनी सर्व सहा सामने जिंकले आहेत. ज्यामध्ये गट टप्प्यातील सामने सुपर सिक्स फेरी आणि उपांत्य फेरीतील सामन्यांचा समावेश आहे. भारतीय संघाने पहिल्या सामन्यात वेस्ट इंडिजचा ९ गडी राखून पराभव केला होता. यानंतर यजमान मलेशियाचा १० गडी राखून पराभव केला. टीम इंडियाविरुद्ध श्रीलंकेचाही ६० धावांनी पराभव झाला. तर भारताची सलामीवीर त्रिशा गोंगाडीच्या शतकाच्या जोरावर भारताने स्कॉटलंडविरूद्ध १५० धावांनी मोठा विजय नोंदवला. तर उपांत्य फेरीत इंग्लंडचा ९ विकेट्सने धुव्वा उडवला. तर अंतिम फेरीत पोहोचलेला दक्षिण आफ्रिकेचा संघही या स्पर्धेत एकही सामन्यात पराभूत झालेला नाही.

# चॅम्पियन्स ट्रॉफीचा उद्घाटन सोहळा होणार नाही

**नवी दिल्ली, दि. ३१ :**

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ पूर्वी कोणताही उद्घाटन सोहळा होणार नाही. आयसीसी कॅप्टनचे अधिकृत फोटोशूटही होणार नाही. ही स्पर्धा आयसीसी स्पर्धेच्या यजमान देशात होत असली तरी, १९९६ नंतर देशातील पहिली आयसीसी स्पर्धा, पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या तयारीचा भाग होणार नाही.

एका सूत्राने क्रिकबझला सांगितले की, आयसीसी किंवा पीसीबीने कधीही उद्घाटन सोहळ्याची घोषणा केली नाही. काही संघ पाकिस्तानात उशिरा पोहोचत आहेत, त्यामुळे हे शक्य नाही.

यापूर्वी, गुरुवारी, पीटीआयने वृत्त दिले होते की पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद लवकरच उद्घाटन समारंभाची घोषणा करतील. महाराजा रणजित सिंह यांनी बांधलेल्या हजुरीबाग किल्ल्यात याचे आयोजन करण्यात येणार आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ १९ फेब्रुवारी ते ९ मार्चदरम्यान खेळवली जाईल.

इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाचे संघ १८ किंवा १९ फेब्रुवारीला लाहोरला पोहोचतील. इंग्लंडचा संघ सध्या भारतासोबत टी–२० आणि

▶ **१८ फेब्रुवारीपासून स्पर्धा सुरू**

एकदिवसीय मालिका खेळत आहे. त्याचबरोबर ऑस्ट्रेलिया श्रीलंका दौऱ्यावर आहे. जिथे त्याला दोन कसोटी आणि दोन एकदिवसीय सामने खेळायचे आहेत. या दौऱ्यातील शेवटचा सामना (दुसरा एकदिवसीय) १४ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे खेळवला जाईल. क्रिकबझच्या मते, आयोजकांनी सांगितले की, पाकिस्तानमध्ये संघांच्या आगमनाच्या वेगवेगळ्या तारखांमुळे उद्घाटन समारंभ किंवा कर्णधारांचे फोटोशूट शक्य नाही.

सूत्राने सांगितले की, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाच्या संघांनी लाहोरला पोहोचण्याच्या मार्गावर विश्रांती घेतली आहे. दोन्ही संघ एक दिवस आधी किंवा सुरुवातीच्या सामन्याच्या दिवशी (१९ फेब्रुवारी) येणार असल्याने, स्पर्धेपूर्वी सर्व कर्णधार उपलब्ध होणार नाहीत. अशा परिस्थितीत उद्घाटन सोहळा होणार नाही, कर्णधारांचे फोटोशूट किंवा पत्रकार परिषद होणार नाही. इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया ब गटात आहेत. या स्पर्धेतील दोघांचा पहिला सामना २२ फेब्रुवारी रोजी लाहोर येथे होणार आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १५० **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 150 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .